जनता शिक्षण संस्थेचे

# किसन वीर महाविद्यालय, वाई

ता. वाई, जि. सातारा, महाराष्ट्र पिन - ४१२ ८०३
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नीत
NAAC Accredited : B' (CGPA 2.66)
Website : kvmwai.edu.in

E-mail : wai161.cl@unishivaji.ac.in
Ph. (Office) : 02167-299326
oskvmwai@rediffmail.com
UDISE No. : 27311111516
prin.kvm@rediffmail.com
Index No. : J21.11.001



किसन महादेव वीर
संस्थापक - अध्यक्ष
जनता शिक्षण संस्था, वाई

| डॉ. गुरुनाथ जी. फगरे | श्री. शंकरराव दाजीबा गाढवे | श्री. मदन प्रतापराव भोसले |
|---|---|---|
| प्राचार्य | उपाध्यक्ष | अध्यक्ष |
| मोबा. नं. ९४२११०७६३५ / ९४०४१४०३७१ | जनता शिक्षण संस्था, वाई | जनता शिक्षण संस्था, वाई |

संदर्भ क्र. :

दिनांक : 26/02/2022

प्रति,
मा. प्रा. युवराज खरात
सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय, रहिमतपूर,
ता.कोरेगाव

विषय : आभासी पद्धतीने व्याख्यान देण्याबाबत.

महोदय,

दि. २७ फेब्रुवारी हा दिवस ज्येष्ठ साहित्यिक वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस, "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवसाचे औचित्य साधून आमच्या महाविद्यालयात अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत मराठी विभाग, ग्रंथालय विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमीकक्ष (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि. २८ फेब्रुवारी, २०२२ रोजी सकाळी ठीक ०९:३० वाजता "मराठी भाषेचे महत्व" या विषयावर आभासी पद्धतीने आपल्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी कृपया आपण सदर कार्यक्रमात मार्गदर्शन करावे.

कळावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

प्राचार्य

J. S. SANSTHA'S KISAN VEER MAHAVIDYALAYA Wai Dist. Satara

o/c

Scanned with CamScanner

जनता शिक्षण संस्थेचे

# किसन वीर महाविद्यालय, वाई

ता. वाई, जि. सातारा, महाराष्ट्र पिन - ४१२ ८०३
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नीत
NAAC Accredited 'B' (CGPA 2.66)
Website : kvmwai.edu.in



किसन महादेव वीर
संस्थापक - अध्यक्ष
जनता शिक्षण संस्था, वाई

E-mail : wai161 ci@unishivaji.ac.in
Ph. (Office) : 02167-299326

oskvmwai@rediffmail.com
UDISE No. : 27311111516

prin.kvm@rediffmail.com
Index No. : J21.11.001

| डॉ. गुरुनाथ जी. फगरे | श्री. शंकरराव दाजीबा गाढवे | श्री. मदन प्रतापराव भोसले |
|---|---|---|
| प्राचार्य | उपाध्यक्ष | अध्यक्ष |
| मोबा. नं. ९४२११०७६३५ / ९४०४१४०३७१ | जनता शिक्षण संस्था, वाई | जनता शिक्षण संस्था, वाई |

संदर्भ क्र. : 124/1049

दिनांक : 04/05/2022

प्रति,
मा. प्रा. युवराज खरात
सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय,
रहिमतपूर

विषय : आभार पत्र

महोदय,

सोमवार दि. २८ फेब्रुवारी २०२२ रोजी आमच्या महाविद्यालयामध्ये अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत मराठी विभाग, ग्रंथालय विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष **(IQAC)** यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या "मराठी राजभाषा गौरव दिन" या कार्यक्रमास आपण आभासी पद्धतीने व्याख्यान देऊन मार्गदर्शन केले, त्याबद्दल आपले महाविद्यालयाच्या वतीने आभार.

J. S. SANSTHA'S KISAN VEER MAHAVIDYALAYA Wai Dist. Satara

आपला विश्वासू,

प्राचार्य

O/C
3/3/2022

Scanned with CamScanner

**जनता शिक्षण संस्थेचे**

**किसन वीर महाविद्यालय वाई, जि.सातारा**

अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत मराठी विभाग, ग्रंथालय विभाग व

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त

व्याख्यान (आभासी )

सोमवार, दि. २८/०२/२०२२ वेळ: सकाळी, ०९:३० वाजता

## कार्यक्रमपत्रिका

| | |
|---|---|
| **प्रास्ताविक** | : प्रा. डॉ. चंद्रकांत कांबळे<br>( मराठी विभागप्रमुख, किसान वीर महाविद्यालय, वाई ) |
| **स्वागत** | : डॉ. रवींद्र बकरे<br>( अग्रणी महाविद्यालय प्रमुख ) |
| **प्रमुख पाहुण्यांचा परिचय** | : प्रा. डॉ. धनंजय निंबाळकर<br>(मराठी विभाग, किसान वीर महाविद्यालय, वाई ) |
| **प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन** | : प्रा. युवराज खरात<br>( मराठी विभाग, सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय, रहिमतपूर ) |
| **अध्यक्षीय मनोगत** | : डॉ. गुरुनाथ फगरे<br>( प्राचार्य, किसान वीर महाविद्यालय, वाई ) |
| **आभार** | : डॉ. एस. पी. कांबळे<br>( ग्रंथपाल व IQAC प्रमुख ) |
| **सूत्रसंचालन** | : डॉ. संग्राम थोरात<br>( मराठी विभाग, किसान वीर महाविद्यालय, वाई ) |

J.S. SANSTHA'S ... MAHAVIDYALAYA WAI Dist. Satara

PRINCIPAL
KISAN VEER MAHAVIDYALAYA
Wai, Dist. Satara

Scanned with CamScanner

जनता शिक्षण संस्थेचे

# किसन वीर महाविद्यालय वाई, जि. सातारा



अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत मराठी विभाग,ग्रंथालय विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC)

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त

## व्याख्यान ( आभासी )

सोमवार, दि. २८/०२/२०२२ — वेळ: सकाळी, ०९:३० वाजता

---

**व्याख्याते :** **प्रा. युवराज खरात**

( सहायक प्राध्यापक, सरदार बाबासाहेब माने, महाविद्यालय, रहिमतपूर )


**अध्यक्ष :** **डॉ. गुरुनाथ फगरे**

( प्राचार्य, किसन वीर महाविद्यालय, वाई )

---

| डॉ. चंद्रकांत कांबळे | डॉ. शिवाजी कांबळे | डॉ. गुरुनाथ फगरे |
|---|---|---|
| ( मराठी विभागप्रमुख ) | (ग्रंथपाल व IQAC प्रमुख ) | (प्राचार्य, किसन वीर महाविद्यालय, वाई) |

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner

# अहवाल

**कविवर्य कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा केला जातो. त्याचाच एक भाग म्हणून आमच्या महाविद्यालयात सोमवार दि. २८/०२/२०२२ रोजी प्रा. युवराज खरात यांचे "मराठी भाषेचे महत्व" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.**

महाराष्ट्राला मोठी परंपरा असून, साहित्यिकांनी तिला वैभव प्राप्त करून दिले, असे प्रतिपादन सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय रहिमतपूर येथील प्रा. युवराज खरात यांनी केले. अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत मराठी विभाग, ग्रंथालय विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त "मराठी भाषेचे महत्व" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात कवी कुसुमाग्रज ऊर्फ वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमापूजनाने झाली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे, माजी प्रभारी प्राचार्य डॉ. एकनाथ भालेराव उपप्राचार्य प्रा. विलास करडे, डॉ. भानुदास आगेडकर, मराठीविभाग प्रमुख डॉ. चंद्रकांत कांबळे शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापरिषदेचे सदस्य प्रो. (डॉ.) सुनील सावंत, ग्रंथालय विभागप्रमुख डॉ. शिवाजी कांबळे कार्यालयप्रमुख श्री. रघुनाथ शेलार यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या व्याख्यानात प्रा. खरात पुढे म्हणाले, साहित्यिक हा लेखनाच्या माध्यमातून समाजाच्या वेदना मांडत असतो. कला ह्या मानवी जीवनात अत्यंत महत्त्वाच्या असून, मानवाला आनंद देण्याचे काम त्या करत असतात. ग्रामीण भागात बोलली जाणारी भाषा ही अस्सल मराठी भाषा असते. संत साहित्यापासून ते आधुनिक मराठी साहित्याचा आढावा घेऊन त्या त्या काळातील साहित्यिकांचे योगदान त्यांनी अधोरेखित केले. कविवर्य कुसुमाग्रज यांच्या 'स्वप्नांची समाप्ती' या कवितेचा उल्लेख करून, कवी हा प्रतिमांच्या माध्यमातून कविता कशा लिहितो हे सांगितले. मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अनेक संधी असून, त्यांनी त्याचा लाभ घेतला पाहिजे.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. फगरे म्हणाले, मराठी भाषेचे संवर्धन होण्यासाठी सर्वांनी दैनंदिन जीवनामध्ये तिचा वापर केला पाहिजे. सुशिक्षित लोकांनी मराठी भाषेच्या संवर्धनामध्ये मोठे योगदान दिले पाहिजे. मराठी भाषेला फार प्राचीन परंपरा असून, तिला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे गरजेचे आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाची भाषा ही मराठी असली पाहिजे. गरज नसताना इंग्रजी भाषेचा वापर न करता मराठीचा वापर होणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मराठी विभागप्रमुख डॉ. चंद्रकांत कांबळे यांनी कवी कुसुमाग्रज यांचे सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान स्पष्ट करून, मराठी भाषेचा प्रसार व प्रचार होणे गरजेचे असल्याचे सांगितले. मान्यवरांचे स्वागत अग्रणी महाविद्यालय योजना प्रमुख प्रा. रवींद्र बकरे यांनी केले. पाहुण्यांचा व प्राचार्यांचा परिचय डॉ. धनंजय निंबाळकर यांनी करून दिला. उपस्थितांचे आभार डॉ. शिवाजी कांबळे यांनी मानले, तर सूत्रसंचालन डॉ. संग्राम थोरात

Scanned with CamScanner

यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी यशस्वितेसाठी प्रा. अमोल कवडे डॉ. चंद्रशेखर भारती डॉ. शिवाजी ताटे डॉ. राहुल वळीव, प्रा. किरण शिंदे व श्री. जितेंद्र चव्हाण यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

सकाळ

# साहित्यिकांनी महाराष्ट्राला दिले सांस्कृतिक वैभव

## प्रा. खरात; किसन वीर कॉलेजात मराठी भाषा गौरव दिन

**वाई, ता. ४ :** महाराष्ट्राला मोठी परंपरा असून, साहित्यिकांनी तिला वैभव प्राप्त करून दिले, असे प्रतिपादन सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय रहिमतपूर येथील प्रा. युवराज खरात यांनी केले.

अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत येथील किसन वीर महाविद्यालयातील मराठी व ग्रंथालय विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'मराठी भाषेचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. कवी कुसुमाग्रज ऊर्फ वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरवात झाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे होते. यावेळी डॉ. एकनाथ भालेराव, उपप्राचार्य प्रा. विलास करडे, डॉ. भानुदास आगेडकर, मराठी विभागप्रमुख डॉ. चंद्रकांत कांबळे, विद्यापीठ विद्यापरिषदेचे सदस्य प्रो. (डॉ.) सुनील सावंत, ग्रंथालय विभागप्रमुख डॉ. शिवाजी कांबळे, कार्यालय प्रमुख रघुनाथ शेलार यांची उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. फगरे म्हणाले, "मराठी भाषेचे संवर्धन होण्यासाठी सर्वांनी दैनंदिन जीवनामध्ये तिचा वापर केला पाहिजे. गरज नसताना इंग्रजी भाषेचा वापर न करता मराठीचा वापर होणे गरजेचे आहे." डॉ. चंद्रकांत कांबळे यांनी

प्रास्ताविक केले. प्रा. रवींद्र बकरे यांनी स्वागत केले. डॉ. धनंजय निंबाळकर यांनी परिचय करून दिला. डॉ. शिवाजी कांबळे यांनी आभार मानले. डॉ. संग्राम थोरात यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अमोल कवडे, डॉ. चंद्रशेखर भारती, डॉ. शिवाजी ताटे, डॉ. राहुल वळीव, प्रा. किरण शिंदे व जितेंद्र चव्हाण यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले. यावेळी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

K. S. SANSTHA'S KISAN VEER MAHAVIDYALAYA WAI Dist. Satara

PRINCIPAL
KISAN VEER MAHAVIDYALAYA,
Wai, Dist. Satara

Scanned with CamScanner

ऐक्य

# साहित्यिकांनी महाराष्ट्राला सांस्कृतिक वैभव दिले : प्रा. खरात

**वाई**, दि. ४ : महाराष्ट्राला साहित्यिकांची मोठी परंपरा असून, साहित्यिकांनी महाराष्ट्राला वैभव प्राप्त करून दिले, असे प्रतिपादन प्रा. युवराज खरात यांनी केले.

अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत मराठी विभाग, ग्रंथालय विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषेचे महत्त्व या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात कवी कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमापूजनाने झाली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे, माजी प्रभारी प्राचार्य डॉ. एकनाथ भालेराव, उपप्राचार्य प्रा. विलास करडे, डॉ. भानुदास आगेडकर, मराठी विभाग प्रमुख डॉ. चंद्रकांत कांबळे शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापरिषदेचे सदस्य प्रा.डॉ. सुनील सावंत, ग्रंथालय विभागप्रमुख डॉ. शिवाजी कांबळे, कार्यालयप्रमुख रघुनाथ शेलार यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. खरात म्हणाले, साहित्यिक हा लेखनाच्या माध्यमातून समाजाच्या वेदना मांडत असतो. कला या मानवी जीवनात अत्यंत महत्त्वाच्या असून, मानवाला आनंद देण्याचे काम त्या करत असतात. ग्रामीण भागात बोलली जाणारी भाषा ही अस्सल मराठी भाषा असते. संत साहित्यापासून ते आधुनिक मराठी साहित्याचा आढावा घेऊन त्या त्या काळातील साहित्यिकांचे योगदान त्यांनी अधोरेखित केले. कविवर्य कुसुमाग्रज यांच्या 'स्वप्नांची समाप्ती' या कवितेचा उल्लेख करून, कवी हा प्रतिमांच्या माध्यमातून कविता कशा लिहितो हे सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. फगरे म्हणाले, मराठी भाषेचे संवर्धन होण्यासाठी सर्वांनी दैनंदिन जीवनामध्ये तिचा वापर केला पाहिजे. सुशिक्षित लोकांनी मराठी भाषेच्या संवर्धनामध्ये मोठे योगदान दिले पाहिजे. मराठी भाषेला फार प्राचीन परंपरा असून, तिला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे गरजेचे आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाची भाषा ही मराठी असली पाहिजे. गरज नसताना इंग्रजी भाषेचा वापर न करता मराठीचा वापर होणे गरजेचे आहे.

प्रास्ताविकात मराठी विभागप्रमुख डॉ. चंद्रकांत कांबळे यांनी कवी कुसुमाग्रज यांचे सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान स्पष्ट करून, मराठी भाषेचा प्रसार व प्रचार होणे गरजेचे असल्याचे सांगितले. प्रा. रवींद्र बकरे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. डॉ. धनंजय निंबाळकर यांनी पाहुण्यांचा व प्राचार्यांचा परिचय करून दिला. डॉ. शिवाजी कांबळे यांनी आभार मानले, डॉ. संग्राम थोरात यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. अमोल कवडे, डॉ. चंद्रशेखर भारती, डॉ. शिवाजी तारे, डॉ. राहुल वळीव, प्रा. किरण शिंदे, जितेंद्र चव्हाण यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

Scanned with CamScanner